# *मला भावलेल्या व्यक्ती*

## प्रसंग - रोटरी क्लब, मिटींगमध्ये अध्यक्षीय भाषण

*दि. - - -, स्थळ - रोटरी क्लब, हॉल, जळगाव*

*संपर्कात येणाऱ्या व्यक्तीच आयुष्य घडवतात हे तर त्रिवार सत्य आहे. एखादी सामान्य व्यक्ती आयुष्यावर खोल परिणाम करते. ज्यांना स्वतःच्या आयुष्यात काही विधायक करायचे असते ते काही शिकवणाऱ्यांच्या सतत शोधात असतात. जे मनापासून शिकवतात, घडवतात ते भावतातसुद्धा. मग ती आई असो, काका असो, सहकारी असो किंवा रस्त्यावरचा फाटका माणूस. या विषयीच सविस्तर बोलतात श्री. भवरलाल जैन. सरतेशेवटी श्रोत्यांबरोबर प्रश्नोत्तरेही रंगतात.*

मित्रहो,

मागे एकदा, रोटरीचा काहीतरी कार्यक्रम होता. त्या वेळी 'भाऊ, आपण कार्यक्रमाचे अध्यक्ष व्हा,' असे मला सांगितले. तेव्हा मी त्यांना सांगितले, आपण 'दागिना' म्हणून मला वापरु नका, कारण मी स्वतः कधी दागिने घातले नाहीत. ज्यांनी घातले त्यांचेकडे पहायला विशेष वेळ मिळाला नाही, (हंशा)म्हणून दागिना म्हणून वापरण्यापेक्षा जर काही विशेष निष्पन्न होण्यासारखे विधायक काम असेल तर त्या ठिकाणी मला अवश्य बोलवा. रोटरीच्या आपल्या कार्यक्रमाला वर्षातून कमीत कमी मी एकदा जरूर येईन. त्या वचनाची आठवण देत श्री. कोगटाजी परवा माझ्याकडे आले, आणि म्हणाले, "भाऊ, आता वेळ आलेली आहे. वर्ष संपायला येत आहे. आपण आता भाषणासाठी यायला पाहिजे." मी त्यांना सांगितले, "मी आता भाषण करायचे बंद केले आहे." तेव्हा त्यांनी विचारले, "मग काय करायचे?" मी म्हटले, "आपण ठरवा काय करायचे." मी भाषण सोडून काहीही करायला तयार आहे. तर ते म्हणाले, "प्रश्नोत्तरे ठेवू." मी म्हणालो, "माझी काही हरकत नाही. पण असा कार्यक्रम या आधी आपल्या रोटरीमध्येच झाला आहे, परंतु प्रश्न नवीन असतील, त्यामुळे उत्तरेही नवीन असतील." मग त्यांनी जाता जाता सांगितले, "आपल्या जीवनात अशा काही व्यक्ती आल्या असतील, अशा काही घटना घडल्या असतील की ज्यांनी आपणावर एक प्रकारचा 'ठसा' उमटवला आहे, की ज्यांना आपण विसरु शकला नाही, तशा घटना, तशा व्यक्ती, याबद्दल थोडीशी चर्चा केली, तर त्यामधून कदाचित जास्त चांगल्या प्रमाणात प्रश्नोत्तरे होऊ शकतील." आणि लगेचच मला असे वाटले की,

हे शक्य आहे. विषयही नवीन आहे. विषय मांडण्याची पद्धतही नवीन आहे. त्यामुळे त्यांचे ते आमंत्रण मी मान्य केले. येताना माझ्याबरोबर पाहुणे होते. त्यामुळे विचार करायला फुरसत मिळाली नाही, पण या भावस्पर्शी विषयाची सुरुवात मी मातृवंदेनेने करतो.

आईने माझ्यावर अमीट असा ठसा उमटवला आहे. आई अजूनही हयात आहे. भाग्याचे हे एक लक्षण आहे, की आपण ५८ वर्षाचे असतानासुद्धा आपली आई आपल्याबरोबर असावी. माझी आई, माझी पहिली भागीदारीण होती. खऱ्या अर्थाने ती मूळ संस्थापक होती. घरामध्ये  ज्या वेळी मी ७००० रु. मागायला गेलो, त्या वेळी सगळ्यांची बैठक झाली. त्यांनी असे ठरवले की, गेल्या ५२ वर्षांत आपल्या घरामध्ये, आपण केवळ सातच हजार रुपये बचत करू शकलो आहोत. अजूनसुद्धा एखाद्या मुलीचे लग्न केले, तर आपल्याला घरात असलेली एकमेव सोन्याची वीट गहाण ठेवावी लागते, आणि मगच लग्न लागते. परिणामतः अजूनही आपली परिस्थिती अशी नाही, की आपण कोणत्याही एका कामासाठी सात हजार रुपये एकदम खर्च करावे किंवा गुंतवावे. कुणाचे बरे-वाईट झाले तर काय होईल? उद्या घरात कोणी आजारी पडले तर पैसे कुठून आणायचे? लग्नकार्य असेल तर पैसे कुठून आणायचे? हा व्यावहारिक विचार त्या बैठकीमध्ये त्यावेळी कर्ते असलेल्या बन्सीलालजी काकांनी मांडला, आणि तशी ते माझी समजूत काढू लागले. त्यांचा हेतू असा होता की, ७००० रुपयांपेक्षा २-४ हजारांच्या गुंतवणुकीत होत असेल तर बघ. ७००० रु.च नेमके आपल्याजवळ आहेत, ते सर्व तू मागत आहेस, हे काही बरे नाही.

त्या वेळी आई माझ्या मदतीसाठी धावून आली. आणि तिने काय म्हणावे? तिने करारीपणाने सांगितले, “आपण सगळे, हे लक्षात घ्या की माझा मुलगा पहिल्यांदाच आयुष्यात काहीतरी मागतो आहे. आत्तापर्यंत आपण त्याला शिक्षण दिले. त्याच्या पद्धतीने तो वाढला. आता तो काहीतरी करू इच्छितो आहे. पहिल्यांदाच घरातून अपेक्षा करतो आहे. म्हणून त्याला आपण सुरुवातीलाच एकदम नाही म्हणणं योग्य नाही. आपण असे समजा की, हे ७००० रु. दिल्यानंतर यापुढे माझा ह्या घरामध्ये काहीही हिस्सा वाटा नाही. माझा जो काही हिस्सा आहे, तो केवळ हे ७००० रुपये आहे. हे समजून आपण त्याला ते देऊन टाका. पुढे जे व्हायचे असेल ते होईल.” त्या ७००० रु.नी माझ्या व्यावसायिक आयुष्याची सुरुवात झाली. म्हणून मी आपल्याला सांगतो आहे, ‘माझी आई पहिली संस्थापक भागीदारीण होती.’ तिने जर अशी ठाम भूमिका त्या वेळी घेतली नसती, तर कदाचित हा दिवस मला बघायला मिळाला नसता, म्हणून तिने हा शिक्का माझ्या मनावर उमटवला की, **योग्य वेळी आणि योग्य तो निर्णय आपण घेऊ शकलो, तर आयुष्यामध्ये मोठा बदल घडू**

**शकतो.** माझ्या चुलत्यांपैकी एक जरी नाही म्हणाला असता आणि ती घटना घडली नसती तर आज या उद्योग समूहाचा इतिहास अर्थातच वेगळा राहिला असता. याची आपल्याला कल्पना असणे शक्य नाही. म्हणून ही अति विशेष घटना आहे की, उभ्या आयुष्यात ती मी विसरणे शक्य नाही. करारीपणा आणि योग्य वेळी, योग्य निर्णय त्यात गृहीत असणारे धोके स्वीकारुन धडाडीने घ्यावा, हे मी त्यातून शिकलो.

दुसरी गोष्ट परत आईशी संबंधित आहे, माणसाची सुरुवातच मूळ आईने होत असते. म्हणून मी या संवादाला आईपासूनच सुरुवात केली आहे. माझ्या लग्नाची चर्चा चालली होती, त्या वेळी मुली पहायला जायचे होते. ठरविल्याप्रमाणे ३ मुली निवडून त्यातली एक मुलगी मला जी पसंत पडेल, तिच्याशी मी लग्न करायचे असे ठरलेले होते. त्या तीन दिवसांमध्ये ३ मुली पहायच्या आणि एका ठिकाणी नक्की करायचे, अशी आज्ञा मला मिळालेली होती. मी ज्या मुलीच्या निवडीसाठी शेवटी हो म्हटले, ती अशा घरातली होती की, त्यांची आर्थिक परिस्थिती त्यावेळी नाजूक होती. लग्न करायलासुद्धा तिच्या वडिलांकडे पैसे नव्हते, पण मुलगी समाजात शिकली सवरलेली, त्या काळची एस.एन.डी.टी.ची बी.ए. झालेली होती.

आईला घरी येऊन सांगितले हे सगळे. आई नाराज होती, तिच्या मनात विचार घोळत होते की, 'आपल्या कुटुंबातील प्रत्येक मुलीचे लग्न ठरले त्या वेळी आपण हुंडा मोजला होता. माझा मुलगा गोरा-गोमटा आहे, शिकला सवरलेला आहे, त्याला मात्र आता हुंडा मिळणार नाही.' या विचाराने ती नाखूश होती. मला मुलींची लग्ने करावयाची असताना मात्र हुंडा द्यावा लागतो आहे आणि मुलाच्या लग्नासाठी तो मिळत नाही, उलट जेवढा जास्त हुंडा तेवढी मोठी प्रतिष्ठा त्यावेळी समाज देत असे. हा कसला व्यवहार? असा प्रश्न तिला पडला होता. मला अजूनही आठवतो तो क्षण. ती घराच्या मध्यवर्ती चौकात भांडी घासून झाल्यावर ताक घुसळत होती.

मी शिडीवर चढून गच्चीवर जात होतो. त्या वेळेला नेमका तिने मला हा प्रश्न विचारला. आणि मी तिला प्रतिप्रश्न विचारला, "तुला असे का वाटते, की तुझ्या मुलाला हुंडा मिळावा?" तेव्हा तिने मला सांगितले, "माझा मुलगा दिसायला चांगला, सद्गुणी." त्या वेळी चांगला दिसत होतो म्हणे. "त्याचे शिक्षण झालेले आहे, आणि आपले जे घराणे आहे त्यात कुठल्याही प्रकारचे व्यंग नाही. या तीन कारणांसाठी हुंडा मिळावा, अशी माझी अपेक्षा आहे, आणि चौथे कारणही आहे. मी आत्तापर्यंत देत आलेली आहे आणि पुढेही मला द्यावा लागणार

आहे, म्हणून मला हुंडा मिळाला पाहिजे," त्या वेळीही या तिच्या म्हणण्यात तिचे तर्कशास्त्र अगदी स्पष्ट होते.

मी तिला सांगितले, "थांब, तुझा मुलगा देखणा आणि गुणी आहे, म्हणून त्याला हुंडा मिळाला पाहिजे. तुझा मुलगा शिकलेला आहे, म्हणून त्याला हुंडा मिळायला हवा. त्याचे घर-घराणे चांगले आहे, म्हणून त्याला हुंडा मिळायला पाहिजे. ही तुझी तीन कारणे आहेत. चौथे कारण तू देते म्हणून तुला मिळायला पाहिजे, हे गौण आहे असे मला वाटते, कारण तू द्यावा अशी कोणी तुला बळजबरी केलेली नाही. त्यामुळे दिला नसता तरी चालले असते कदाचित. उरलेल्या तीन कारणांचे मी खंडन करू इच्छितो. जी तुझ्या मुलाला लागू आहेत, ती त्या मुलीलाही लागू आहेत. ती मुलगीही देखणी आहे." म्हणजे त्या वेळी होती ती. "मुलगी शिकलेली आहे, ती मुलगीसुद्धा चांगल्या घराण्यातील आहे. ह्या तीन निकषांसाठी जर तुला हुंडा हवा असेल, तर हे तिन्ही निकष तिच्याजवळही आहेत. पण आज त्यांची हुंडा देण्यासारखी परिस्थिती नाही, मग काय करायला पाहिजे?" माझ्यातल्या सुप्त वकिलाने आईची अशी क्रॉस एक्झामिनेशन करायला सुरुवात केली.

तत्क्षणी माझ्या आईने मला सांगितले, "तू म्हणतो ते मला पटते, पण ती एवढी शिकली सवरलेली असल्यामुळे ती कामावर जाईल अन् मला डबा बनवायला लावील, असे काही होऊ देऊ नको." मी म्हटले, "त्याची मी तुला खात्री देतो. जोपर्यंत मी आहे, तोपर्यंत तुला असे वागवले जाणार नाही." मित्रांनो एकमेकांशी अगदी तसेच बोलून आम्ही परस्परांशी लग्न केले. थोडक्यात, हा प्रसंग माझ्या जीवनामध्ये मी अत्यंत महत्त्वाचा मानतो की, ज्यामध्ये आपल्या काही कल्पना किंवा कौटुंबिक कल्पना, रुढी म्हणून आपल्याला स्वीकार कराव्याशा वाटतात किंवा आपण करतो, त्याला जर आपण असल्या प्रकारचे एक खुले वातावरण निर्माण करुन त्याबद्दल चर्चा केली तर त्यातून पर्याय मार्ग निघतो, आणि तो तोडगा त्या दिवशी निघाला. आयुष्यभराच्या यशामध्ये या गोष्टीचे फार महत्त्व असल्यामुळे, ही घटना मी आपल्यापुढे ठेवली.

ज्या वेळी मुली बघायला नाशिकला गेलो, त्या वेळी माझा एक कॉलेज जीवनातील वर्ग मित्र माझ्याबरोबर होता. त्याचे नाव पंढरीनाथ सावे. ती घटना मी विसरू शकत नाही; महत्त्वाची घटना आहे. मुलगी बघायला गेलो. ती मुलगी एका वकिलाची मुलगी होती. मुलगी चांगली आणि हुशार होती. मी विचारलेल्या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर मात्र तिने मला प्रतिप्रश्न विचारुनच दिले होते. अशी एकूण परिस्थिती होती. मी मुलाखत संपवून

बाहेर पडलो. त्या काळी टांगे असत, त्यामध्ये आम्ही बसून चौकाजवळ आलो. त्या वेळी मी सावेला विचारले, “का रे सावे, तुला काय वाटतं? बघ, घर-घराणे चांगले आहे, लोक श्रीमंत आहेत, मुलगी हुशार आहे.” मी त्याला फासा टाकत होतो. त्याला विचारत होतो. त्याच्या मनात काय आहे ते काढून घ्यावे, म्हणून आधी सर्व जमेच्या बाजू मांडत होतो.

त्याने मला सांगितले, “भवरलाल, तुला जीवन म्हणजे ‘रणभूमी’ बनवायची आहे का? प्रत्येक प्रश्नाचे उत्तर, त्या पोरीने प्रश्न विचारुन दिले. सरळ उत्तरे दिली नाहीत. मला तरी असे वाटले की, एक प्रकारची वादविवाद स्पर्धा होती, किंवा वक्तृत्व स्पर्धा होती! काही दोघांनी मिळून जीवन जगण्यासारखी पद्धत आहे, असे काही मला वाटले नाही. राहता राहिले, ते श्रीमंत आहेत, त्यांच्याजवळ गडगंज पैसा आहे, ते लग्न चांगल्या पद्धतीने करतील आणि त्यामुळे समाजात कदाचित प्रतिष्ठासुद्धा वाढेल, ज्याची आपल्याला गरज आहे,” तो पुढे जाऊन जे म्हणाला, तो विचार मी आपल्यापुढे मांडू इच्छितो, तो विचार मी विसरु शकलेलो नाही. तो म्हणाला, “भवरलाल, या सगळ्या गोष्टी काळाच्या ओघामध्ये इतिहास जमा होणाऱ्या आहेत. तुझे लग्न कसे झाले, कशा पद्धतीने झाले, तुला किती हुंडा मिळाला, वगैरे...वगैरे...वगैरे...! महत्त्वाची गोष्ट तुझ्याबरोबर आयुष्यभर रहाणार आहे, ती म्हणजे मुलगी आणि तीच जर अशी असेल, तर मग ह्या सगळ्या गोष्टींचा उपयोग काय? याचा विचार आपण करावा! आयुष्याला ‘रणभूमी’ करण्यापेक्षा ‘रंगभूमी’ केलेले बरे!” म्हणजे लग्न करत असताना किंवा मुलगी निवडत असताना आपले जे प्राथमिक आणि मूलभूत निकष आहेत, जीवनामध्ये या निकषांबद्दल आपल्या मनात किती स्पष्ट मत हवे, याचे सावेंनी दिलेले उत्तर, एक सुंदर आणि मार्मिक उदाहरण होते.

माझ्या आयुष्यामध्ये आत्तापर्यंत माझ्या मुलांची, किंवा मुलींची लग्ने करत असताना, मी ती गोष्ट विसरु शकलेलो नाही. उलट त्या गोष्टीबद्दल - खूप सखोल विचार करून मी माझे काही निकष ठरवले आहेत, ते निर्माण केले आहेत. आजपर्यंत आपण बघाल की, आमच्या कुटुंबामध्ये कोणाही फार मोठ्या गडगंज श्रीमंत घराण्यातील मुलगी आलेली नाही. त्याचा अर्थ संपत्ती वाईट आहे असे कृपा करून समजू नका. याचा अर्थ श्रीमंतांशी मला संबंध जोडायचे नाहीत, असेही समजू नका. माझ्या इतर निकषांवर ते जर बसत असतील, आणि त्यांच्याकडे संपत्तीही असेल, तर असा योग म्हणजे दुधात साखर आहे, परंतु घर किंवा संपत्तीला किंवा ज्याला आपण ‘श्रीमंती’ म्हणतो त्याला माझ्या एकूण

गुणपत्रकामध्ये १०० पैकी केवळ १० गुण आहेत. म्हणजे त्या कुटुंबाला १० पैकी १० गुण मिळतील, पण त्याला ९० गुण अजून कमवायचे आहेत. त्या नव्वदामध्ये दुसरे निकष आहेत. त्यांच्यामध्ये तो बसत नसेल तर तो पन्नासाच्या वरही जात नाही, आणि पर्यायाने तो संबंध जमत नाही.

मी आता जे बघतो आहे, माझ्या या घरामध्ये, माझ्या जीवनात ज्या प्रकारची शांती, ज्या प्रकारचे समाधान आम्ही प्राप्त करु शकलो, याची मुळे त्या असल्या घटनांमध्ये आहेत. त्या काळापासून मला अशा व्यक्तींचा सहवास मिळाला की, ज्यांनी असल्या प्रकारचे विचार मांडले. माझ्या मनाला ते भावले. त्यांचा मी स्वीकार केला म्हणूनच आज आम्हाला हे सुखसमाधान लाभले.

जीवनामध्ये असे बरेचसे निकष आहेत. मी दलुभाऊंचे एक उदाहरण सांगतो. आम्ही एका दुकानामध्ये कापड खरेदी करायला गेलो. माझ्याकडे तीन सदरे होते. "तीन सदऱ्यांवर चालत नाही. आता महाविद्यालयामध्ये जातो. चौथा सदरा तू घ्यायला पाहिजे." असा दलुभाऊंनी आग्रह धरला. मी म्हटले, "तीन पुरतात. एक धुवायला टाकला तरी एक शिल्लक असतो. पावसाळ्यातसुद्धा धुवायला टाकला, तरी एक शिल्लक असतो, मग त्याचा तसा काही त्रास होत नाही." ते म्हणाले, "तसे नाही. एखाद्या वेळी वेगळा कपडा घालावासा वाटतो. त्या वेळी ३ असले तर ते काही जमत नाही, म्हणून सदऱ्याचे कापड घ्यायला जाऊ." दलुभाऊ त्या वेळी प्रिमियर ऑटोमोबाईल, म्हणजे फियाट बनविणाऱ्या कंपनीमध्ये नोकरी करीत होते. २५६ रुपये महिना त्यांचा पगार होता आणि निरीक्षक म्हणून काम असल्यामुळे त्यांना खाकीचे कपडे घालावे लागत होते. नाही तर मग ते खराब होऊन जायचे, आणि तसे कपडे धुऊन इस्त्री करायला पुरेसे पैसे नसायचे. त्या कारणासाठी आणि ते खाकी कापड स्वस्त आणि टिकाऊ होते, म्हणून दलुभाऊ तसे कपडे वापरत असत.

आम्ही कापड दुकानावर गेलो. दुकानदाराने कापडाचे ठान पुढे ठेवले. दलुभाऊंचे डोळे एका विशिष्ट प्रकारच्या कपड्यावर गेले. आणि ते म्हणाले, "भवरु, तो कपडा मला चांगला वाटतो." मलाही चांगला वाटला होता तो, पण मी त्याकडे मुद्दाम कानाडोळा केला होता. कारण तो फार महाग असेल असे मी गृहीत धरले होते, पण त्यांनी तो काढायला लावला. त्या वेळी तो कपडा बाजारात नवीनच आलेला होता. त्या कापडाचे नाव होते नायलॉन. त्यांनी सांगितले, "याचा एक सदरा करुन टाक." मी सांगितले, "याची काय किंमत आहे, याची मला कल्पना आहे." ते म्हणाले, "याची किंमत काहीही असू दे. एक

लक्षात ठेव. जीवनामध्ये जर अभिरुची निर्माण करायची असेल, तर हीही अभिरुची निर्माण कर. कमी प्रतीचा कपडा, कमी प्रकारचे शिक्षण, वागणे, असला विचार मनात येऊ देऊ नकोस. आवड ठेवायचीच असेल तर, चांगली आवड जपली पाहिजे.''

मी त्यांना विचारले, ''आपण स्वतः १२ आणे किंवा १४ आणे वाराचा कपडा वापरीत आहात. मी २.५० रु. वाराचा हा कपडा घ्यायला हवा, असे म्हणता, हा विरोधाभास नाही का?'' तर ते म्हणाले, ''नाही, ते माझे कर्तव्य आहे, आणि तो तुझा अधिकार आहे. तुझ्या वडिलांनी त्यांच्या पोटाला चिमटा देऊन मला शिकवले. मला पदविकाधारक केले. तेव्हा हे मी माझे कर्तव्य समजतो की, माझ्यासुद्धा पोटाला चिमटा देऊन मी तुला कमीत कमी 'पदवीधर' केले पाहिजे.'' आणि अशा पद्धतीने आमच्या या कुटुंबामध्ये पहिला पदवीधर निर्माण झाला, तो म्हणजे मी. **आपण अभिरुचीचा स्तर राखून ध्येय उंच ठेवले, गुणवत्तेला जोपासावे** असा मंत्र त्या दिवशी मला त्यांच्याकडून शिकायला मिळाला. तो अजूनही माझ्या स्मरणात आहे, जिवंत आहे!(टाळ्या)

आयुष्यात खूप खूप माणसे भेटलीत. त्यातील काहींची भेट मात्र अगदी थेट लक्षात राहिली. अगदी साध्या साध्या गोष्टी, तसेच आणखी इतरही खूप काही त्या भेटीतून शिकलो. फार मोठ्या लोकांशी माझा संबंध, सुदैवाने किंवा दुर्दैवाने आला नाही. जे काही शिकलो, ते सर्वसाधारण माणसांकडून शिकलो. त्यातले एक उदाहरण आठवते.

मी लुधियानाला गेलो होतो. लुधियाना पंजाबमध्ये आहे. त्या वेळी आमची पर्ल यामाहा मोटर सायकलची एजन्सी होती. त्या एजन्सीच्या कामानिमित्त मला तिथे नेहमी जावे लागत असे. त्या दिवशी मी ज्या हॉटेलमध्ये थांबलो होतो, तिथून तयार होऊन, पराठा आणि दही खाऊन, कपडे वगैरे करून खाली उतरलो. खाली उतरल्यानंतर तिथे बूट पॉलिश करणारा माणूस बसला होता. त्याच्या समोर पाय ठेवला, आणि त्याने पॉलिश करायला सुरुवात केली. सकाळचे ७:३० - ७:४५ वाजले होते. झुळझुळ वारा वाहत होता. मी प्रसन्नचित्त होतो. त्याला विचारले, 'क्यों भाई, कैसा चल रहा है?' त्याने उत्तर दिले 'साब, हमे मरने का दुख नही, और जीने का सुख नही!' हे कृपावंत विधान त्याने माझ्यासमोर फेकले. मी विचार करायला लागलो की, हा माणूस काय म्हणतो? काही वेळ बोललोच नाही. काही अर्थ लागत नव्हता. त्यानंतर त्याला परत विचारले, 'तुम ऐसा क्यो कहते हो?' तो म्हणाला, 'साब, क्या फर्क पडता है? मैं सबेरे उठता हूँ। यहाँ आता हूँ। वही जुते, वही चप्पल पॉलिश करता हूँ। शामको जाता हूँ। थक जाता हूँ। घर जा के सो जाता हूँ।

फिर सबेरे आके वही करता हूँ। मुझे कुछ कमजादा हो गया, तो किसी को कुछ फर्क पडनेवाला नही। और मैं मर गया, तो भी इस दुनिया में किसीको फर्क पडनेवाला नहीं। तो इसलिये मरने का भी दुख नहीं है, ना जीने की कोई खुशी है, आनंद है।'

आता ही जी मनोवस्था आहे, ती फार कमी लोकांची असू शकते. ज्याला आपण स्थितप्रज्ञ असे म्हणतो, तशा प्रकारचा हा माणूस होता. तो काही जीवनाविषयी आळशी म्हणून बोलत नव्हता. ते विधान करत असताना किती गूढ तत्त्वज्ञान त्यामध्ये भरले होते की, ज्याबद्दल मी विचार करत राहिलो. आजही तो प्रसंग मला आठवतो.

दुसरी एक घटना आहे. घाटकोपरला मी नवीनच ॲम्बॅसेडर गाडी घेतली होती, आणि ती मी स्वत:च चालवत होतो. चालवत असताना ती मागे (रिव्हर्स)घेतली. मागे एका टॅक्सीवाल्याच्या गाडीच्या मागच्या मडगार्डला नुसता धक्का लागला. त्या धक्क्याची खूण म्हणजे टायरची जी काही निशाणी होती, ती त्यावर होती. त्या पलीकडे त्याला काहीही खराबी झालेली नव्हती, किंवा काही त्रास झाला नव्हता. नुकसान तर मुळीच नव्हते, परंतु तो ट्रॅक्सी ड्रायव्हर लगेच माझ्यासमोर आला आणि त्यांने मला सांगितले, "१० रुपये दो साब" मी त्याला म्हटले, "तुला काही झाले नाही. तुझ्या गाडीला काही झाले नाही. मग तू कशाचे पैसे मागतो आहेस? त्यानेही नव्यानेच टॅक्सी घेतलेली होती. त्याने काय उत्तर द्यावं? "साब, पैसे इसलिये नही माँग रहा हूँ की, आपकी गाडी से मेरी गाडी को कुछ तकलीफ हुई है। पैसे इसलिये माँग रहा हूँ की, भाग्यवानों का धक्का हमको लग गया है! हमें उसीकी याद रह जाये।" म्हणजे "भाग्यवान अशा माणसाचा त्याला धक्का जरी लागला, तरी आपले बरे होऊ शकते, या भावनेतून काहीतरी पैसे आपण मला देऊन टाका." मला वाटते माझ्या खिशात १० रु. होते. ते १० रु. काढून मी त्याला दिले. केवळ १० रुपयात जीवनामध्ये एक धडा शिकलो. ज्या पद्धतीने आपण विचार करता, त्या पद्धतीने तुमचे जीवन घडत जाते. या प्रसंगात मी जे पाहिले, ते त्या ड्रायव्हरचे अप्रतिम विक्री कौशल्य आणि व्यवहारचातुर्य कसे असते पहा, एकच गोष्ट आपण सकारात्मक किंवा नकारात्मक पद्धतीने मांडू शकतो, मात्र तशी दृष्टी हवी. त्याने ती सकारात्मक पद्धतीने मांडून आपले स्वत:चे उद्दिष्ट साध्य केले होते. त्याने भांडण-तंट्याचा मार्ग पत्करला असता तर तसे करणे त्याच्या फायद्याचे ठरले नसते. जो काही मंत्र त्याने त्या दिवशी मला सांगितला, तो किती यथार्थ आणि मार्मिक होता.

एकदा लंडनहून बर्मिंगहॅमला मी भाड्याच्या कारने म्हणजे टॅक्सीने जात होतो. आम्ही

दोन जण मागे बसलो होतो. ड्रायव्हर गाडी चालवत होता. रिमझिम पाऊस पडत होता. तिथला रिमझिम म्हणजे धोऽ धोच आहे, तसा पाऊस पडत होता. रस्ता एकदम निसरडा झालेला होता. पुढच्या टॅक्सीने एकदम ब्रेक मारला, काही कारणासाठी. आणि याचा ब्रेक तेवढ्या जोरात लागू शकला नाही. म्हणून हा त्याच्यामागे जाऊन त्याच्या गाडीला धक्का बसला. दोन्ही ड्रायव्हर एकाच वेळी त्यांच्या गाडीचा दरवाजा उघडून बाहेर आले आणि दोघांच्या तोंडून एकच वाक्य - एकाच वेळी बाहेर पडले, "मी माफी मागतो." त्यापलीकडे ते काहीच बोलले नाहीत. दोघेही जण गाडीमध्ये परत बसले. तिथपर्यंत समोरुन येणारा माणूस होता तो थांबला, म्हणजे तो बघ्या म्हणून थांबला नाही. त्याचा उद्देश काय झाले हे समजून घेण्याचा होता, म्हणून तो थांबला. त्याने दोन्ही गाड्यांचे क्रमांक लिहिले. आणि तो पुढे चालता झाला. तो कोणाशीही बोलला नाही. यांनीसुद्धा त्याच्या गाडीचा क्रमांक लिहून घेतला आणि ते निघून गेले. काही चर्चा नाही. काही वादविवाद नाही. कोणाचा आवाज चढला नाही, कोणाला राग आला नाही.

मला मोठे आश्चर्य वाटले, कारण माझ्यासाठी हे नवीनच चित्र आहे. हे कसे शक्य आहे? मी त्या टॅक्सीवाल्याला विचारले, "अरे बाबा, हे काय ते मला समजले नाही. तो दुसरा थांबला काय, 'मी माफी मागतो' म्हणतो काय तू त्याला ठोकून दिले अन् मी माफी मागतो असे तो म्हणतो काय ! याला काही अर्थ आहे का? त्याने मला सांगितले, "प्रश्न काय आहे, माझ्या गाडीचा धक्का त्याच्या गाडीला लागला. त्याच्या गाडीचा विमा आहे आणि माझ्याही गाडीचा विमा आहे. विमा कंपनीने पैसे भरायचे आहेत. तेव्हा त्याला वाईट वाटायचे कारण काय आहे? वाद घालायचे कारण काय आहे?" मी म्हणालो, ते ठीक आहे. तो समोरुन येणारा माणूस का थांबला होता?" माझ्या टॅक्सी ड्रायव्हरने उत्तर दिले, "तो साक्षीदार(Witness) होता." असे घडले, हे विमा कंपनीने जर साक्षीदार विचारला तर तो साक्षीदार म्हणून थांबला होता. म्हणून त्याच्या गाडीचा क्रमांक मी लिहून घेतला आहे. आणि जर जरुर पडली की, असा हा अपघात झाला याला साक्षीदार म्हणून तो माणूस होता, म्हणून त्याने हे क्रमांक टिपले.

विचार करा, किती पद्धतशीर तो समाज सुस्थापित झाला आहे. त्या गोष्टीचा कोणत्याही प्रकारचा आकस किंवा आकांडतांडव किंवा भानगडी किंवा बोलणे-चालणे नाही. अगदी विधिवत जे काही करायचे होते ते करून टाकले. विषय संपलेला होता. ते व्यवस्थितपणे गाडी चालवायला लागले.

आपल्याकडे कार सोडा, सायकलचा अपघात झाला तर २०० माणसे गोळा होतात. आणि पुण्यामध्ये तर 'तत्त्वाचा प्रश्न आहे,' इथून चर्चा सुरु होते. डाव्या बाजूला चालला होता का उजव्या बाजूला चालला होता, हा पुढे आला आणि हा तीन फूट पुढे झाला, २ फूट इकडे गेला, वगैरे वगैरे. मग याला नंबर प्लेटच नाही, कर भरलेला नाही, वगैरे वगैरे. तेही घडलेले मी पाहिले आहे. म्हणजे पुण्यात एका रिक्षाने एका सायकलवाल्याला ठोकला. तेव्हा तिथे आम्ही सगळे अडकून पडलो. मला तो प्रसंग आठवतो. आणि मीसुद्धा उतरुन फक्त त्यांचे संभाषण ऐकत होतो.

तिसरा असाच एक प्रसंग गुजराथमध्ये अहमदाबाद या शहरामध्ये बघायला मिळाला. आमची टॅक्सी चालली होती. त्या टॅक्सीमागून एकाने चुकीच्या बाजूने स्वतःचे वाहन पुढे नेले. आणि माझ्या टॅक्सीवाल्याला त्याचा धक्का लागला. त्या वेळी मला आधीच उशीर झाला होता. मला असे वाटले की, गेली आपली नियोजित भेट! कारण आता यांची जुगलबंदी चालणार. वाहतूक खोळंबणार, परंतु गुजराथी लोक किती व्यावहारिक असतात. त्याचे उदाहरण त्या दिवशी मला बघायला मिळाले. ज्या ड्रायव्हरने धक्का मारला होता, आणि ज्याला धक्का लागला होता ते दोघंही बाहेर उतरले. 'लाव लाव, ५० रुपये लाव' असे एक म्हणाला आणि लगेच त्या दुसऱ्या माणसाने काही वादविवाद न करता ५० रु. काढले आणि त्याला देऊन टाकले. तडजोड झाली. डोक्याला ताप नको. सगळे ठीक-ठाक झाले.

इकडे पुण्यामध्ये तत्त्वाच्या गोष्टी, सगळ्याच भानगडी चालूच आहेत. म्हणजे अर्धा तास वाहतुकीचा खोळंबा झाला. आणि इथे दीड - दोन मिनिटात सगळा व्यवहार आटोपला. विदेशात तर एक सेकंदही लावला नाही, आणि मी माफी मागतो म्हणून रवाना झाले. समाजामध्ये ज्या विभिन्न प्रकारच्या प्रवृत्ती आहेत, त्यांचे हे चित्रण आहे. अशा प्रकाराने हे घडते, लहान-लहान गोष्टी आहेत. पण त्यामधून शिकण्यासारखे पुष्कळ आहे. गुजराथी माणूस हा व्यवहारी माणूस आहे. 'अरे बाबा' गाडीला लागले ना, मग कशाला डोक्याला ताप द्यायचा? तुझा काय खर्च असेल तो घे, तू मोकळा हो आणि मलाही मोकळे कर. आपण पैसे कमवून तरी घेऊ. उगाच भानगडी कशाला करतोस. पन्नास किंवा काय लागतील ते घेऊन टाक. कदाचित ५०च्या ऐवजी ३० दिले असते, तरी माझ्या टॅक्सी ड्रायव्हरने चूपचाप ते घेतले असते. त्याने दिले, ह्याने घेतले. तो बसला. आमची गाडी चालू झाली. दोन-अडीच मिनिटांचा खोळंबा झाला असेल!

१९७१ साल असेल. १ लाख रुपये एका व्यक्तीला माझ्या मित्राच्या सांगण्यावरुन मी दिले. पुढे तो माणूस जास्त अडचणीत आला. अवघड परिस्थितीतून तो बाहेर पडू शकला नाही, आणि त्याला पैसे परत देणे अशक्य झाले. माझा हा मित्र नेहमीच मनस्वी अपराधी भाव बाळगून म्हणायचा, 'भवरलाल, मी सांगितल्यामुळे तू पैसे दिले, ते पैसे तो माणूस परत करु शकलेला नाही. दुर्दैवाने पैसे परत करण्यासाठी माझ्याजवळही नाहीत.' कारण खरेच त्याच्याजवळही पैसे नव्हते. तेव्हा मी माझ्या या मित्राला म्हटले, "तुला असे वाटते? मी कधी तुला या विषयावर काही बोललो का?" "नाही, तू बोलला नाहीस म्हणूनच मला असे वाटते आहे, तू बोलला असतास तर आपण विषय संपवून टाकला असता. पण तू बोलला नाहीस, म्हणूनच मला फार बोचते आहे."

मी त्याला सांगितले, "तुला तसे वाटायचे कारण नाही. पैसे देण्याचा निर्णय मी घेतला होता, तू घेतलेला नव्हता. तू सल्ला दिला होतास आणि तो सल्ला देतांना सुध्दा, तू तुझी कारणे स्पष्ट सांगितलेली होतीस. तू ज्या पद्धतीने ती कारणे सांगितली, त्यात मी काही ना काही तरी शिकला. या एका लहानशा वाक्यामध्ये, 'माझ्याजवळ पैसे असते तर मी दिले असते' कितीतरी मोठा इतिहास, तुझ्या आणि त्याच्या प्रेमाचा, मैत्रीचा, संबंधांचा माझ्यासमोर ठेवला होतास तुझ्या त्या एका वाक्यामध्ये तू माझी परीक्षा घेतली होतीस की, मी तुझा किती खरा मित्र आहे. तुझ्या त्या एका वाक्यामध्ये तू एवढा शिरभार करुन ठेवला होता की, त्यामुळे तत्क्षणी मला असे वाटले, मजजवळ नसतीलही तरी ते पैसे आणून दिले पाहिजेत. म्हणून मी त्याला ते पैसे दिले. त्याचे तुला वाईट वाटायचे काहीच कारण नाही."

कालांतराने त्या माणसाने ते पैसे मला परत केले. तो माझा मित्र निवृत्त झाला होता कंपनीमधून. त्यांचे नाव आहे, हांडा साहेब. आमच्या कंपनीमध्ये ते फ्रेंड, फिलॉसॉफर आणि गाईड म्हणून काम करतात. म्हणजे मला जर मुलांचा राग आला किंवा मुलांना माझा राग आला तर मध्ये असा दोघांचे ऐकून घेणारा कोणीतरी माणूस पाहिजे. आणि हे एकमेकाना समजवेल की दोघांचे कसे चुकते आहे! जेव्हा माझे चुकते आहे, तेव्हा मला ते नेहमी सांगत राहिले आणि त्यांचे चुकते आहे, त्यांना सांगत राहिले. आणि त्यामुळे आमच्यामध्ये अंतर पडण्याची शक्यता ते कमी करत राहिले. अशा प्रकारची त्यांची भूमिका आहे. या गृहस्थाकडून मी जीवनात खूप शिकलो, म्हणूनच मी त्यांना फ्रेंड, फिलॉसॉफर आणि गाईड अशी संज्ञा दिली आहे.

व्यवसाय कसा करावा? व्यवसायामध्ये प्रामाणिकपणाचे काय स्थान आहे? जीवनात फायद्यासाठी पळवाटा शोधू लागलात तर आपण कुठे पोहोचाल? जर आपण पळवाटा केल्या नाहीत, तर आपण कुठे पोहोचाल? या सगळ्या गोष्टींचा खूप खोलवर असा विचारविनिमय आणि चर्चा सतत या माणसाशी मी करत आलो आहे. म्हणूनच ज्या काही घडामोडी आहेत त्या मला विसरणे शक्य नाही. त्या लहानलहान अशा गोष्टींमधून हे जीवन घडलेले आहे. आपल्याला त्या कितपत आवडल्या, आपल्याला काय लाभ होऊ शकेल, याची मला कल्पना नाही. मित्रांनो, आता

ज्यांना कोणाला प्रश्न विचारायचे असतील त्यांनी प्रश्न विचारावेत. मला त्यांची उत्तरे देणे आवडेल.

प्रश्नः आज लाच घेणे हा समाजाला मोठा रोग झाला आहे. काही अंशी काम करवून घेण्यासाठी थोडीफार लाच देणे मान्यता प्राप्त करू लागले आहे, पण याला कुठे तरी 'लक्ष्मणरेषा' असावी याबद्दल आपल्याला काय वाटते?

उत्तरः तो काळ म्हणजे 'परमिट राज' १९९२ पूर्वी देशामध्ये ते प्रचलित होते. ते कमीअधिक प्रमाणात अजूनही आहे. त्या काळात, एक कारखाना टाकायचा म्हणून परवाना घ्यायचा होता. परवाना घेण्यासाठी ५/६ लोक रांगेत होते, ते काहीही करायला तयार होते, आणि ते वाट्टेल ते करायला तयार होते. हे मी ज्या वेळी म्हणतो, तर ते काय करायला तयार होते? एक उदाहरण देतो. जे संबंधित अधिकारी होते, ते केवळ पैसे खात होते असे नव्हे तर, त्यांना बाई, बाटली आणि पैसा ह्या तिन्ही गोष्टींची आवड होती. आमच्यापुढे धर्मसंकट होते ते हे की, आम्ही बाटली पुरवायला तयार नव्हतो; बाई पुरवायला तयार नव्हतो; पैसा पुरवायला तयार होतो. तेव्हा परवाने शेवटी त्यांना मिळाले. आपल्याला काही परवाना मिळणार नाही, अशी जवळपास मला खात्री होती. आणि तो त्याप्रमाणे परवाना आम्हाला मिळाला नाही. दुसऱ्या कोणाला मिळाला, त्याची मला जीवनात मुळीच खंत वाटत नाही. जर मी तसे केले असते तर आज ज्या ताठ मानेने जगू शकतो, माझ्या स्वतःच्या सद्सद्विवेकबुद्धिला स्मरुन वागू शकतो, तसे मी वागू शकलो नसतो.

तसे केले असते तर कदाचित आहे, त्यापेक्षा जास्त पैसा झाला असता, शक्यता आहे. टिकला असता की नसता, कल्पना नाही. बहुतेक टिकण्याची शक्यता नाही. 'असा पैसा वाऱ्याच्या वेगाने येतो आणि पाण्यासारखा वाहून जातो,' अशी इंग्लिशभाषेमध्ये म्हण आहे. ज्या प्रकाराने पैसा मिळतो, त्याच प्रकाराने तो जातो. वारेमाप मिळाला तर पाण्यासारखा जातो. तेव्हा असले पैसे किंवा असली संपत्ती टिकते, यावर माझा सुतराम विश्वास नाही.

जर माझ्यासमोर काही उदाहरणे असली तर ती या गोष्टीची आहेत की, असा पैसा टिकत नाही. असा पैसा पहिल्याच पिढीमध्ये तुमच्या आयुष्यामध्ये संपतो. जर फारच भाग्यवान असाल, जर तुमच्याकडे काही पूर्वसंचित असेल, तर कदाचित दुसऱ्या पिढीपर्यंत तो टिकेल, परंतु दुसऱ्या पिढीत तो निश्चित संपतो. तिसऱ्या-चौथ्या, पाचव्या-सहाव्या पिढीला तो पैसा पुरतच नाही.

आपण फार मोठा प्रश्न विचारलात. की, जीवनामध्ये 'लक्ष्मणरेषा' कुठे असावी. लाच घेणे हा कायद्याने गुन्हा आहे, तसे तो देणे हाही गुन्हा आहे. पैसे द्यायला आम्ही तयार झालो, म्हणजे गुन्हा करायला आम्ही तयार झालो. खऱ्या अर्थाने पैसे द्यायलाच नकोत. आणि जो माणूस असे करु शकतो, तो माझ्यापेक्षा चांगला माणूस आहे, असे मी मानतो. एक शिक्षक, एक प्राध्यापक, एक तत्त्वज्ञानी किंवा एक खेड्यात राहणारा माणूस ज्याला हे करावे लागत नाही, तो अजूनही माझ्यापेक्षा श्रेष्ठ माणूस आहे, असे मी म्हणतो.

मी पैसे दिले असते, तसे अपवादाने थोडेफार मी आजही देत असतो. बहुतांशी नाही म्हणतो, पण काही वेळा अजूनही, मला जाणीव असतानासुद्धा, पैसे द्यावे लागतात. पण ते चुकीचे आहे, असे मी मानतो. ज्याला हे करायची गरज वाटत नाही, त्या संस्थेला माझा अजूनही साष्टांग नमस्कार आहे! आणि तो दिवस आयुष्यात यावा, अशी माझी मनोमन तीव्र इच्छा आहे. या कंपनीमध्ये, कोणत्याही कारणाकरता पैसा दिला जात नाही, असे जर मी म्हणू शकलो मोठ्या अभिमानाने, तर मी पूर्णपणे जीवन जगलो असे मला वाटेल. अजूनही अपूर्णपणे जीवन जगतो आहे, याची मला आंतरिक खंत आहे.

सत्संग हा विषय फार मोठा आहे. परंतु मर्यादित स्वरुपामध्ये सत्संग म्हणजे 'चांगल्या माणसांचा सहवास' असे आपण म्हणतो. माझ्या मनामध्ये चांगल्या माणसांपेक्षाही चांगल्या विचारांचा सहवास ह्या गोष्टीचे जास्त महत्त्व आहे. जीवन एवढे लहान आहे, सीमित आहे की, त्यामध्ये असल्या सगळ्या चांगल्या माणसांबरोबर रहायला मिळेल असे नाहीच, शक्यही नाही, म्हणून आपण जर पुस्तके वाचली आणि त्या विचारांचा सत्संग ठेवला, तर तो जास्त जवळचा किंवा जास्त चांगला आहे असे मला वाटते.

कितीही म्हटले तरी माणूस, मग तो कसाही असो, शेवटी माणूसच आहे. त्याच्या संगतीचे काही फायदे आणि तोटे आहेतच. कितीही चांगला मित्र असला, तरी त्याच्या ठिकाणी काही ना काही उणिवा असतातच. त्याची कुठे ना कुठे, काही ना काही स्वार्थाची भावना असू शकते. अगदी आपण गुरुमहाराजांकडे गेलात तरी आपण त्यांना लवून नमस्कार केला पाहिजे. कुठे इतरत्र आपण गेलात, तर त्यांचे नाव आपण काढले पाहिजे, अशी

त्यांची अपेक्षा आहे. त्यांचा तो स्वार्थच आहे. तशी त्यांनी इच्छा/कामना करायला नको, अशी त्यांच्याकडून अपेक्षा आहे. परंतु ते सुद्धा तेवढे करतात, तेही स्वार्थापोटीच.

आपल्याला कोणत्याही व्यक्तीचा सत्संग घ्यायचा असेल, तर त्याबरोबर काही ना काही मर्यादा स्वीकाराव्या लागतील. पण पुस्तक आणि वाचन हा असा सत्संग आहे की, त्यामध्ये असा काही दोष नाही. आपल्याला नाही आवडले, तर आपण सोडून द्या. आपल्याला नाही पटले, विचार करु नका. आवडले, अंगीकारा. एक वेळा नव्हे, दहा वेळा वाचा. जे पाहिजे ते करण्याची संधी त्यामध्ये प्राप्त होते. असा सत्संग जर आपण निभवू शकलो आणि त्यासाठी जीवनात काही वेळ काढू शकलो, तर मला असे वाटते, आपण बरेच काही साध्य करु शकू. त्यापेक्षा जास्त काही करण्यात जीवनामध्ये आनंद येईल अशी शक्यता सुतराम नाही. कोणतेही कार्य, मग तो व्यवसाय असो, उद्योग असो, दुकान असो किंवा इतर काही असो कोणतेही काम आपणास करायचे असेल, छोटीशी आध्यात्मिक चळवळ चालवायची असेल, तरी आपल्याला कुठे ना कुठे, काही ना काही कमीअधिक उणिवा स्वीकाराव्या लागणार आहेत, कुठे ना कुठे तडजोडही करावी लागणार आहे. केवळ पुस्तक वाचनात तडजोड करायची गरज नाही; जे आहे ते आहे, जे नाही ते नाही. आणि अशा गोष्टींचा जर सत्संग आपण घेऊ शकलो, तर मला असे वाटते की, त्यापेक्षा जीवनात आनंदाचा मोठा क्षण नाही.

(श्री. पगारियांचा स्वानुभवः) आता भाऊंचे विचार आपण सगळ्यांनी ऐकलेत. भाऊ जसे आपल्यासमोर बोलत आहेत, दिसत आहेत, तसेच त्यांचे आचरणसुद्धा आहे. अशा वेळी मलाही जो अनुभव आला आहे, तो सांगण्याचा मोह होत आहे. १९७५ साली भाऊंकडून जेव्हा मी एजन्सी घेतली त्यानंतरची ही ७७-७८ ची गोष्ट आहे. भाऊंकडे त्या वेळी अशोक लेलॅन्डची आणि राजदूत एस्कॉर्टची एजन्सी होती. मला आठवते की, त्या वेळी अशोक लेलॅन्डचा ३० - ४० हजार प्रिमियम चालू होता. माझ्या दुकानात संध्याकाळच्या वेळी मी असे ऐकले की, जैन ब्रदर्समध्ये कोणीतरी माणसाने, दाक्षिणात्य माणूस होता तो, आज प्रिमियम घेतला आहे आणि त्याला गाडी देणार आहेत. लगेच मला दुसऱ्या दिवशी कळले की, भाऊंना ही गोष्ट कळली. भाऊंनी दुसऱ्या दिवशी हजेरी घेतली, त्या माणसाला बोलावले आणि त्याला पैसे परत करायला लावले. त्या वेळी मला खरोखर अपार आनंद वाटला, आणि मी म्हटले की, त्या वेळचे ३० ते ४० हजारचे प्रिमियम म्हणजे ती रक्कम आज जवळ जवळ ८ ते १० लाख रु. किमतीची झाली असती मी ही माझ्या आयुष्यात ठरवले

की, आपल्याला जर आयुष्यात पुढे जायचे असेल तर, आपणही असे काही 'तत्त्व' पाळले पाहिजे. आणि त्या दिवशी मी हे ही ठरवले की, ग्राहकाशी आपण इमानदारीनेच वागायला पाहिजे. माझ्या दुकानात लुनावरती हजार रुपयाचे प्रिमीयम होते, एकही रुपया मी माझ्या ग्राहकाकडून घेतला नाही. तरीही माझा धंदा खूप चांगला झाला. हा 'धडा' मी भाऊंकडून शिकलो, म्हणून मी भाऊंचे 'उपकार' मानतो. धन्यवाद.(टाळ्या)

(भाऊंचा प्रतिसादः)

जीवनात दोन गोष्टींबद्दल सखोल विचार करून मी काही निर्णयांपर्यंत निश्चित पोहोचलो आहे. एक म्हणजे, कोणत्या गोष्टीबद्दल 'तडजोड' करावी, आणि दुसरे म्हणजे, कोणत्या गोष्टी बद्दल करू नये. हॅरॉल्ड लास्की याचे पुस्तक वाचत असताना हा विचार माझ्या मनामध्ये बळावला. हॅरॉल्ड लास्कीच पुस्तक आहे, 'ग्रामर ऑफ पॉलिटिक्स'. म्हणजे, राजकारणाचा कर्ता, कर्म आणि क्रियापद. 'राजकारण म्हणजे काय?' या विषयावर त्याने खूप खोल विचार करुन हे पुस्तक लिहिले, "मूळ तत्त्वाशी कल्पनेशी कधीच तडजोड करू नका. अगदी केलीच तर ती तेवढ्या विषयापुरतीच मर्यादित ठेवा." थोडक्यात, जर एखादा विषय आपल्या आयुष्यातल्या ध्येयधोरणाचा भाग असेल, तर त्यामागे अभेद्यपणे उभे रहा आणि आपल्या अशा वागण्याने फक्त नैमित्तिक फरक पडणार असेल तर वाहत्या वाऱ्यासोबत जाणे अधिक व्यवहार्य ठरेल.

समाजामध्ये मूल्यांची जी काही व्याख्या आहे, ती काळानुसार थोड्याफार प्रमाणात बदलत असते. जी मूलभूत, चिरंतन मूल्ये आहेत, त्यांच्यामध्ये फारसा काही फरक झालेला दिसत नाही, म्हणजे चोराला कोणी चांगले म्हटले आहे, अशातली परिस्थिती अजून आलेली नाही. किंवा अप्रामाणिकतेला प्रामाणिकतेपेक्षा जास्त महत्त्व प्राप्त झाले असेही नाही. अप्रामाणिक माणसाला महत्त्व प्राप्त झाले असेल, परंतु अप्रमाणिकतेला प्रामाणिकतेपेक्षा जास्त महत्त्व प्राप्त झालेले आहे, असे सहसा घडत नाही.

तेव्हा ही जी काही 'मूळ मूल्ये' आहेत, मूलभूत मुद्दे आहेत, आपल्या संस्कृतीचे, धर्माचे असू दे, आपल्या जीवनाबद्दल, ज्या गोष्टींचा थेट संबंध जीवनभर येणार आहे, अशा गोष्टींचा असू दे, आपल्या सद्सद्विवेकबुद्धीचा असू दे, त्यासाठी आणि त्याबद्दल आपण कधीही तडजोड करु नये. इतर गोष्टी म्हणजे, चांगल्या गोष्टी करण्यासाठीसुद्धा कधी कधी काही वाईट गोष्टी कराव्या लागतात. मला हॉस्पिटल सुरु करायचे असेल, त्यासाठी पाच-पन्नास हजार लाचलुचपत द्यावी लागेल. हॉस्पिटल कितीतरी चांगले काम

करणार आहे, परंतु त्यासाठीसुद्धा पैसा देणे आवश्यकच आहे. शाळा काढायची असेल तर, शाळेची परवानगी घ्यायला २-२ लाख रुपये द्यावे लागतात ही वस्तुस्थिती आहे. मग त्यासाठी आपण शाळाच उभारू नये का? शाळा ज्ञानदानाकरिताच स्थापन करणे, हा जर मूळ उद्देश असेल, आणि ते जर चांगले काम असेल, तर हे मूलभूत स्वरूपाचे काम आहे. त्यासाठी लाच द्यावी लागणे, हा गुन्हा आहे, पण मला तो करावाच लागतो! इथपर्यंत मी या विचाराशी सहमत आहे. आपण ज्याला लक्ष्मणरेषा म्हणालात, ती मी ही इथपर्यंत सीमित ठेवले आहे.

आपण मला इथे बोलवले आणि शांत चित्ताने माझे म्हणणे ऐकून घेतले, याबद्दल मी आपला आभारी आहे.

जय हिन्द! जय महाराष्ट्र!